# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 07 April 2025

## Time: 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०७ एप्रिल २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

जागतिक आरोग्य दिवस आज साजरा होत आहे. सर्वांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि आरोग्य विषयक जनजागृती व्हावी या उद्देशानं, हा दिवस साजरा केला जातो. 'निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य' ही यंदाच्या जागतिक आरोग्य दिनाची संकल्पना आहे. माता आणि नवजात बालकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करणं हा या संकल्पनेमागचा हेतू आहे. जागतिक आरोग्य दिनानिमित्त राज्यभरात अनेक जनजागृतीपर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त निरोगी जग निर्माण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. चांगलं आरोग्य हा प्रत्येक समृद्ध समाजाचा पाया असल्याचं त्यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात सांगितलं. सरकार आरोग्यसेवेवर लक्ष केंद्रीत करत राहील, आणि लोक कल्याणासाठी काम करत राहील, असं पंतप्रधानांनी नमूद केलं.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरू होत असून, त्यात प्रमुख व्याजदर किंवा रेपो दर निश्चित करण्यात येणार आहेत. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीची ही पहिली पतधोरण बैठक आहे.

****

सर्व नागरिकांना समान संधी देणं, त्यांना समान वागणूक देणं आणि समाजातल्या मागासलेल्या तसंच वंचित घटकांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणं, हा भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे, असं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. ते काल उझबेकिस्तानमधल्या ताश्कंद शहरात आयोजित आंतर-संसदीय संघाच्या १५० व्या महासभेत बोलत होते. ही महासभा सामाजिक विकास आणि न्यायासाठी संसदीय कृती या संकल्पनेवर आधारलेली आहे.

****

राज्यात गेल्या आठवड्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आणि कृषी अधिकार्यांना दिले असल्याचं, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितलं. नंदुरबार तालुक्यातल्या नुकसानग्रस्त ठाणेपाडा शिवारात कांदाशेतीची पाहणी केल्यानंतर ते काल बोलत होते. या पावसामुळे राज्यातले २४ जिल्हे आणि १०३ तालुके बाधित झाले असून, पंचनामे करुन आठ दिवसात नुकसानीची आकडेवारी कळेल, असं ते म्हणाले.

****

प्रत्येकाला आरोग्य सेवा पुरवण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं, केंद्रीय आयुष आणि आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं. बुलडाणा जिल्ह्यातल्या मेहकर इथं, ग्रामीण महाराष्ट्रातल्या दुसऱ्या विनामूल्य डायलिसिस केअर सेंटर या रक्तशुद्धीकरण उपचार केंद्राचं लोकार्पण करताना ते काल बोलत होते. २०२५ पर्यंत, क्षयरोगमुक्त भारत हे अभियान देशभरात राबवण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. महिलांमधलं कर्करोगाचं वाढतं प्रमाण लक्षात घेऊन महिलांची यासंदर्भात तपासणी करण्यात येत असल्याचं ते म्हणाले. पुण्यातल्या दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयात झालेली घटना दुर्दैवी असून या घटनेची चौकशी करण्यात येत असून, दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असंही जाधव यांनी सांगितलं.

****

सांगली जिल्ह्यात मिरज इथं युनिक इन्स्टिट्यूट ऑफ क्रिटिकल केअर या रुग्णालयाचं लोकार्पण राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांच्या हस्ते झालं. या रुग्णालयामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि परराज्यातून येणाऱ्या रुग्णांना मोठा लाभ होणार आहे. सर्व आधुनिक उपचारांसाठी आवश्यक जागतिक दर्जाची यंत्रं आणि साधनं इथं उपलब्ध आहेत. अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांकडून इथं रुग्णांवर उपचार केले जाणार असल्यानं आपत्कालीन परिस्थितीतदेखील रुग्णांना त्वरित आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळणार आहे.

****

प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातल्या सावली तालुक्यातलं सादागड-हेटी हे गाव राज्यातलं पहिलं आदिवासी सौर ग्राम ठरलं आहे. केवळ २० दिवसांत सर्व अडचणी दूर करून महावितरण -जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद प्रशासनानं या गावात शून्य वीजबिल साध्य केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

रत्नागिरी शहरात पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने काल केलेल्या कारवाईत एका आरोपीकडून ब्राउन हेरॉइन या अंमली पदार्थाच्या १५ पुड्या जप्त केल्या. अरमान आदिल अश्रफ शेख असं आरोपीचं नाव असून, त्याला ताब्यात घेण्यात आलं आहे. त्याच्याकडून अंमली पदार्थासह एकूण ७७ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शहरात रामनवमीच्या अनुषंगाने पोलिसांची गस्त सुरू असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे जयस्तंभ परिसरात ही कारवाई करण्यात आली.

****

पंढरपूरातल्या चैत्री यात्रेच्या पार्श्वभूमीवर चंद्रभागा नदी पात्रात २५० घनफूट प्रतिसेकंद वेगानं काल पाणी सोडण्यात आलं. दोन एप्रिलला सुरु झालेली चैत्री यात्रा १२ एप्रिलपर्यंत सुरु चालणार आहे.

****

बीड इथं आज लोकशाही दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे. तालुका लोकशाही दिनातील उत्तराने समाधान न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनात अर्जदार अर्ज सादर करु शकतात, असं प्रशासनाने कळवलं आहे.

****

ब्राझीलमध्ये झालेल्या जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत काल पुरुषांच्या ७० किलो वजनी गटात भारताच्या हितेश गुलिया यानं सुवर्णपदक पटकावलं. हितेशनं अंतिम सामन्यात इंग्लंडच्या ओडेल कामारा याचा पराभव केला.

****